SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

Estd. 1962
"A++" Accredited
by NAAC(2021)
With CGPA 3.52

जा.क्र. संलग्नता/टी-२/परिपत्रक/ No - 1232 दि. 20 JAN 2024

# परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय:- समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी /व्यवस्थापनाने शासनाकडे अर्ज करण्याच्या कार्यपद्धतीबाबत व तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) बाबत...

संदर्भ:- १) मा.प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे जा.क्र.युएनआय/(०६/२४)/विशि-१/३६६, दि. १६ जानेवारी, २०२४ रोजीचे पत्र
२) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.११२/विशि-३ दि. २९ नोव्हेंबर, २०२३
३) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.११२/विशि-३ दि. १० जानेवारी, २०२४

महोदय/महोदया,

उपरोक्त नमूद संदर्भाकित विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, सोबत जोडलेले पत्र व शासननिर्णय अवलोकनी घेवून **समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी इच्छूक उच्च शिक्षण संस्थांनी /व्यवस्थापनांनी सर्व आवश्यक कागदपत्रासह आणि विहित संस्करण शुल्कासह मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दालन क्र. ४०९, मंत्रालय (विस्तार) मुंबई यांचे कडे अर्ज सादर करावयाचे आहेत.**

कळावे,

आदेशान्वये

श्री. विलास एस. सोयम
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत- वरीलप्रमाणे

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी,शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६
Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक-युएनआय/(०६/२४)/विशि-१ / ३६६ दि. 16 JAN 2024

प्रति,

१.कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
२.सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

**विषय समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी/व्यवस्थापनाने शासनाकडे अर्ज करण्याच्या कार्यपध्दतीबाबत व तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) बाबत**

संदर्भ १.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.११२/विशि-३ दि.२९ नोव्हेंबर, २०२३
२.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.११२/विशि-३ दि.१० जानेवारी, २०२४

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, राज्यामध्ये समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे शासनाने संदर्भिय क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेली आहेत.

त्यानुसार समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी इच्छूक असलेल्या उच्च शिक्षण संस्थांनी/व्यवस्थापनांनी शासनाकडे अर्ज करण्याबाबतची कार्यपध्दती व अर्जासह सादर करावयाचा प्रस्तावित समूह विद्यापीठासंदर्भातील तपशीलवार प्रकल्प अहवाल(DPR)संदर्भिय क्रमांक २ अन्वये निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील अर्ज व सर्व आवश्यक कागदपत्रासह तसेच रु.२५०००/- (अक्षरी रूपये पंचवीस हजार फक्त) संस्करण शुल्कासह मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दालन क्र.४०९, मंत्रालय(विस्तार) मुंबई यांचेकडे सादर करावयाचा आहे.

तरी आपण आपल्या विद्यापीठ परिक्षेत्रातील तसेच विभागातील संबंधित महाविद्यालयांना व व्यवस्थापनांना याबाबत आपल्या स्तरावरून स्वतंत्रपणे अवगत करण्यात यावे.

(डॉ. शैलेन्द्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

**प्रत- माहितीस्तव सादर**
१.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
२.स्वीय सहाय्यक, मा.मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

राज्यामध्ये समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित करणे.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण - २०२३/ प्र.क्र.११२/ विशि - ३,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०२३

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० हे शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी, आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमांना चालना देण्यासाठी, शैक्षणिक संस्थांमधील सहयोग सुलभ करण्यासाठी नाविन्यपुर्ण प्रशासन संरचनेची क्षमता व फायदे ओळखून विद्यमान संलग्नता प्रणाली टप्प्या-टप्प्याने कमी करून नाविन्यपुर्ण बहुविद्याशाखीय शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक लवचिकता प्रदान करीत आहे.

२. विद्यापीठ अनुदान आयोगाने सप्टेबर, २०२२ मध्ये उच्च शिक्षण संस्थांचे बहुविद्याशाखीय संस्थांमध्ये रूपांतरित करण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित केली आहेत या मार्गदर्शक तत्वाचे अनुपालन करण्याचा एक मार्ग हा महाविद्यालयांचे समूह तयार करणे आहे.

३. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) या अंतर्गतही विद्यमान उच्च-कार्यक्षम शैक्षणिक संस्थांचे समूह विद्यापीठांमध्ये रूपांतर करण्यास प्रोत्साहन देण्यात आले आहे. त्यानुसार याअंतर्गत राज्यात तीन समूह विद्यापीठे कार्यरत आहेत (डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ,मुंबई, हैद्राबाद सिंध नॅशनल कॉलिजिएट विद्यापीठ, मुंबई आणि कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा).

४. शैक्षणिक क्षेत्रामध्ये बहुविद्याशाखीयता, सहयोग आणि नवकल्पना वाढवण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) २.० द्वारे प्रदान केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे तपशीलवार विचार करुन आणि महाराष्ट्रातील तीन क्लस्टर विद्यापीठांच्या अंमलबजावणीतून मिळालेल्या अनुभवातून समूह विद्यापीठांच्या स्थापनेसंदर्भात धोरण ठरविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे विहित करीत आहे..

५. या आराखड्याच्या केंद्रस्थानी प्रमूख महाविद्यालयाची संकल्पना आहे. प्रमूख महाविद्यालय हे शैक्षणिक दृष्ट्या उच्च कामगिरी करणारे, आवश्यक ती पायाभूत सुविधा, प्रशिक्षित अध्यापक आणि समूह विद्यापीठाच्या क्रियाकलापांचे मार्गदर्शन आणि समन्वय करण्यासाठी सक्षम असणारे महाविद्यालय/ संस्था असेल जे समूह विद्यापीठातील घटक महाविद्यालये/ संस्थांना सामायिक दृष्टीकोनातून शैक्षणिक उत्कृष्टता आणि सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शन करेल, समन्वयक म्हणून काम करेल, आवश्यक संसाधने एकत्रित करुन क्षमता वाढवेल आणि कर्मचार्यांचा व्यावसायिक दृष्टीकोनाचा विकास करेल.

६. या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रस्तावित समूह विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालयांनी समन्वय, सहयोग आणि सर्वांगीण विकासावर भर देऊन एकसंध शिक्षण प्रणालीमध्ये विलीन होणे अभिप्रेत आहे. या महत्त्वपूर्ण परिवर्तनाचा एक भाग म्हणून, एक एकीकृत नेतृत्व दृष्टीकोन वाढण्याच्या अनुषंगाने समूह विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांच्या प्राचार्यांना त्यांच्या पदांच्या प्रशासकीय आणि शैक्षणिक जबाबदारीसह अखंडपणे समायोजित केले जाणार आहे. या धोरणाचा उद्देश शैक्षणिक संस्थांचे एक शक्तिशाली जाळे तयार करणे, संसाधने, कौशल्ये आणि नाविन्यपूर्ण कल्पना एकत्र करून विद्यार्थ्यांना समग्र व परिपूर्ण शिक्षण अनुभव प्रदान करणे हे आहे.

७. या मार्गदर्शक तत्त्वांचा समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी इच्छुक असलेल्या संस्थाना, प्रशासकांना व इतर शैक्षणिक भागधारकांना एक व्यापक संसाधन म्हणून उपयोग होणार आहे. त्यामुळे मार्गदर्शक तत्वांचा मसूदा सर्व शैक्षणिक भागधारकांच्या विचारार्थ व अभिप्रायार्थ विभागाच्या सार्वजनिक संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला होता. सर्व शैक्षणिक भागधारकांकडून प्राप्त झालेल्या सूचनांचा/ अभिप्रायांचा शासनस्तरावरुन विचार करुन राज्यामध्ये समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठीच्या धोरणाच्या अनुषंगाने मार्गदर्शक तत्वे अंतिम करण्यासाठीचा प्रस्ताव दि. १७ नोव्हेंबर, २०२३ रोजी झालेल्या मा.मंत्री मंडळ बैठकीत सादर करण्यात आला होता. मा.मंत्री मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार समुह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने शैक्षणिक क्षेत्रामध्ये बदलत असलेल्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि कौशल्यपुर्ण वातावरणाचा वापर करुन बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम राबवुन विद्यार्थ्यांना समग्र व परिपुर्ण शिक्षण प्राप्त होण्याच्या दृष्टीने राज्यात समुह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे विहित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

**१) समूह विद्यापीठाच्या निर्मितीसाठी आवश्यक निकषः-**

**अ) महाविद्यालयांची संख्या:**

i) समूह विद्यापीठ तयार करण्यासाठी, एकाच व्यवस्थापन/ शैक्षणिक संस्थेच्या अधिपत्याखालील एकाच जिल्ह्यातील किमान २ व कमाल ५ अनुदानित/ विनाअनुदानित महाविद्यालयांच्या संसाधने, शैक्षणिक, भौतिक आणि तांत्रिक सुविधांचे एकत्रीकरण करणे आवश्यक राहील, यापैकी किमान एक महाविद्यालय अनुदानित महाविद्यालय असणे आवश्यक राहील.

ii) कृषी व आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम वगळता उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत येत असलेली सर्व पारंपारिक व व्यावसायिक महाविद्यालये समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट होण्यास पात्र असतील.

iii) व्यवस्थापन/ शैक्षणिक संस्थेची क्षमता असेल तर ५ पेक्षा जास्त महाविद्यालये/ संस्था समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट करण्यासाठी राज्य शासन प्रकरणनिहाय मुल्यांकन करू शकेल.

**ब) संस्थात्मक आवश्यकता**

i) प्रशासकीय अनुभव:

a) समूह विद्यापीठातील प्रमूख महाविद्यालय मागील २० वर्षांपासून अस्तित्वात असले पाहिजे

ii) किमान नोंदणी:

a) प्रमूख महाविद्यालयात किमान २००० विद्यार्थ्यांची नोंदणी आवश्यक (सर्व अभ्यासक्रमांचा समावेश करुन)

b) सर्व सहभागी महाविद्यालयांमध्ये (प्रमूख महाविद्यालयासह) किमान ४००० विद्यार्थ्यांची नोंदणी आवश्यक (सर्व अभ्यासक्रमांचा समावेश करुन)

iii) भौतिक समीपता: समूह विद्यापीठ स्थापन करण्यासाठी, सहभागी महाविद्यालयांमध्ये योग्य भौतिक निकटता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. या समीपतेमुळे भौतिक संसाधने आणि मानवी संसाधनांचे सामायिकीकरण करणे शक्य होते. तसेच, विद्यार्थी आणि प्राध्यापकांना गतीविधी करणे सुलभ होते.

a) समूह विद्यापीठामध्ये सहभागी होण्यासाठी, प्रमुख महाविद्यालय ज्या जिल्ह्यामध्ये कार्यरत आहे त्याच जिल्ह्यामध्ये घटक/ सहभागी महाविद्यालये असणे आवश्यक आहे. समूह विद्यापीठामध्ये समन्वय साधण्यात आणि समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट घटक महाविद्यालयांमध्ये कार्यक्षम सहकार्य आणि संसाधनांची देवाणघेवाण करण्यात प्रमूख महाविद्यालय मध्यवर्ती भूमिका बजावते.

iv) जागेची उपलब्धता आणि आवश्यक बांधकाम: समूह विद्यापीठामध्ये सहभागी सर्व महाविद्यालयांकडे एकत्रितपणे-

a) किमान १५००० चौमी इतके एकत्रित बांधकाम क्षेत्र असणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त, दि.१५.०९.२०१७ च्या शासन निर्णयात नमूद केलेले निकष तसेच इमारत बांधकाम आणि भौतिक सुविधांबाबत युजीसी/ AICTE व इतर शिखर संस्थांनी निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

आणि

b) बृहन्मुंबई महानगर पालिका व ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्वयंअर्थसहाय्यित Vertical University Campus स्थापन करण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय क्र. स्वअवि -२०२०/ (११/२०)/विशि-४ दि.०१ ऑगस्ट, २०२३ मध्ये नमूद केल्यानुसार बांधकाम क्षेत्र आणि सुविधांसाठी आवश्यक असलेली किमान जमीन.

c) विभागीय मुख्यालयी (कोकण, नागपूर, औरंगाबाद, पुणे, नाशिक, अमरावती) ४ हेक्टर जागा

d) राज्यातील उर्वरीत भागात ६ हेक्टर जागा

**क) शैक्षणिक मानके:**

**i) स्वायत्तता, नॅक (NAAC) मानांकन, एनबीए गुण:-**

**प्रमूख महाविद्यालय**- समूह विद्यापीठामध्ये सहभागी होण्यास पात्र ठरण्यासाठी खालीलपैकी कोणतीही एक अट पूर्ण केली पाहिजेत.

a) प्रमूख महाविद्यालय हे किमान ५ वर्षापासून स्वायत्त दर्जा प्राप्त असलेले महाविद्यालय असेल.

किंवा

b) प्रमूख महाविद्यालयास नॅक (NAAC) चे किमान ३.२५ CGPA मानांकन किंवा समतुल्य एनबीए (NBA) गुण असणे आवश्यक आहे.

किंवा

c) प्रमूख महाविद्यालयातील एकूण अभ्यासक्रमांपैकी ५०% अभ्यासक्रम NBA द्वारे मान्यताप्राप्त असणे आवश्यक आहे.

**घटक महाविद्यालय-** सर्व सहभागी महाविद्यालयांना वैध नॅक (NAAC) मानांकन आणि/ किंवा प्रत्येक महाविद्यालयात किमान ३०% अभ्यासक्रमांना NBA मान्यता असणे आवश्यक आहे

ii) **संशोधन केंद्र:** संलग्न विद्यापीठाने मंजूर केलेली आणि विहित यूजीसी नियमांनुसार असेलली किमान दोन कार्यरत संशोधन केंद्रे असणे आवश्यक आहे.

iii) **संशोधन क्षमता:** प्रमूख आणि सहभागी घटक महाविद्यालयांनी प्रकाशने, संशोधन प्रकल्प हाती घेतलेले असणे आणि संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून उत्कृष्ट संशोधनाचे कार्यप्रदर्शन केले असणे आवश्यक आहे.

iv) **शैक्षणिक कामगिरी:** प्रमूख आणि सहभागी घटक महाविद्यालयांनी आंतरविद्याशाखीय अध्यापन आणि संशोधन कार्यक्रमांमध्ये उच्च शैक्षणिक कामगिरी केलेली पाहिजे.

v) **संसाधनांचे एकत्रीकरण:** प्रस्तावित समूह विद्यापीठ उपलब्ध सार्वजनिक निधी व्यतिरिक्त इतर स्रोतांद्वारे संसाधने वाढवण्यास/ संकलित करण्यास सक्षम असावे.

**ड) किमान ठेवः** समूह विद्यापीठाच्या निर्मितीमध्ये सहभागी होण्यासाठी, समूह विद्यापीठाच्या स्थापनेनंतर आर्थिक हमी म्हणून उच्च शिक्षण संचालनालयासोबत रु. ५ कोटी रक्कमेची ५ वर्ष कालावधीची संयुक्त मुदत ठेव अनिवार्य आहे. आर्थिक व्यवहार्यता तसेच विद्यापीठामार्फत सुरु असलेले उपक्रम चालू ठेवण्यासाठी विद्यापीठाची सक्षमता दर्शविण्यासाठी ही ठेव आवश्यक आहे. मुदत ठेवीवर जमा होणारे व्याज समूह विद्यापीठाच्या उपक्रमांसाठी वापरले जाऊ शकते.

**इ) इतर आवश्यक बाबी:**

i) <u>डिजिटल पायाभूत सुविधा</u>: प्रमूख आणि सहभागी घटक महाविद्यालयांमध्ये अध्यापन, शिक्षण आणि प्रशासनसाठी अद्यावत नेटवर्कींग सुविधांसह डिजिटल पायाभूत सुविधा असणे आवश्यक आहे.

ii) <u>उद्योग सहयोग</u>: प्रस्तावित समूह विद्यापीठाने संशोधन सहयोगासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्था/ उद्योगांसह भागीदारीची सद्यस्थिती सादर केली पाहिजे, तसेच प्रशिक्षणार्थी/ इंटर्नशिप आणि एम्बेडेड पदवी कार्यक्रम प्रदान केले पाहिजेत आणि त्याच्या वाढीसाठी आणि विस्तारासाठी आराखडा सादर केला पाहिजे.

iii) <u>पीएच.डी. स्तरावरील शैक्षणिक अभ्यासक्रम</u>: समूह विद्यापीठाच्या प्रस्तावात पीएच.डी. अभ्यासक्रम, संशोधन कार्य आणि नवकल्पनांचा समावेश असावा.

iv) <u>माहिती तंत्रज्ञान आणि स्टार्ट-अप केंद्रे</u>: प्रस्तावित समूह विद्यापीठासाठी माहिती तंत्रज्ञान केंद्र, स्टार्ट-अप सेंटर, इनोव्हेशन आणि इनक्युबेशन सेंटर आणि इतर संबंधित डोमेनची स्थापना अनिवार्य असेल.

v) <u>बळकट प्रशासन संरचना</u>: प्रस्तावित समूह विद्यापीठामध्ये नियामक संस्थांनी निर्दिष्ट केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एक बळकट अंतर्गत प्रशासन संरचना असावी. त्यांनी संबंधित वैधानिक संस्था जसे की व्यवस्थापन मंडळ, शैक्षणिक परिषद, अभ्यास मंडळ, संशोधन परिषद, वित्त समिती आणि इतर गैर-वैधानिक समित्या स्थापन केल्या पाहिजेत.

vi) <u>पायाभूत सुविधा वाढवणे</u>: समूह विद्यापीठाने विद्यमान इमारतींचे दिव्यांगासाठी पूर्णपणे अनुकूल संरचनांमध्ये रूपांतर करण्याची आणि वर्गखोल्या, प्रयोगशाळा आणि ग्रंथालयांसाठी पुरेशी जागा सुनिश्चित करण्याची योजना आखली पाहिजे.

vii) विद्यार्थ्यांसाठी निवास व्यवस्था: समूह विद्यापीठाने सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना योग्य प्राधान्य देऊन पुरेशी वसतिगृहाची सोय किंवा विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या निवासासाठी योग्य व्यवस्था केली पाहीजे.

**ई) वचनबद्धता:**

प्रस्तावित समूह विद्यापीठाने खालील आवश्यकता आणि अपेक्षा पूर्ण केल्या पाहिजे, ज्या विद्यापीठाच्या DPR मध्ये योग्यरित्या समाविष्ट केल्या जातील :

i) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० ची अंमलबजावणी: प्रस्तावित समूह विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये नमूद केलेल्या कृती मुद्यांची अंमलबजावणी स्पष्ट वेळापत्रकासह करण्यास वचनबद्ध असावे.

ii) स्थानिक आणि इतर भारतीय भाषांमध्ये अभ्यासक्रम उपलब्ध करणे:
प्रस्तावित समूह विद्यापीठाने प्रादेशिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० अंतर्गत शिफारसीत केल्याप्रमाणे भाषिक विविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी मराठी आणि इतर भारतीय भाषांमध्ये काही अभ्यासक्रम उपलब्ध करण्यासाठी वचनबद्ध असले पाहिजे.

iii) नवीन श्रेयांक आराखडा: प्रस्तावित समूह विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने शैक्षणिक व श्रेयांक आराखड्यासंदर्भात शासनाने दिलेल्या निर्देशांचे पालन केले पाहिजे.

iv) विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन: राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य शासनाने निर्गमित केलेल्या सूचना व मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करावे.

v) सुविधा आणि उपक्रमांची भागीदारी: सर्व महाविद्यालयांनी (प्रमुख आणि सहभागी घटक महाविद्यालय) विद्यमान सुविधा सामायिक (एकत्रित) करण्यास सहमती दर्शविली पाहिजे आणि प्रवेश, समानता आणि शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी संयुक्त उपक्रम हाती घेतला पाहिजे.

vi) आयसीटी सक्षम वापर: शैक्षणिक संस्थेने समूह विद्यापीठामधील सर्व महाविद्यालयांमध्ये अध्यापन, शिक्षण आणि मूल्यमापन प्रक्रियेमध्ये माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) समाविष्ट करण्यासाठी वचनबद्ध असले पाहिजे. यामध्ये विद्यार्थ्यांना इंटरनेट सुविधा, लायब्ररीमध्ये डिजीटल डेटाबेस, लर्निंग मॅनेजमेंट सिस्टिम (LMS) डिजिटल सामग्री उपलब्ध केली पाहिजे.

vii) कार्य मूल्यांकन प्रणाली: अध्यापन आणि अध्यापनशास्त्रातील गुणवत्ता आणि प्रभाव राखण्यासाठी अध्यापन आणि अध्यापनशास्त्रातील नावीन्यता ओळखण्यासाठी सर्वसमावेशक अभिप्राय आणि कार्यप्रदर्शन मूल्यमापन प्रणाली लागू केली पाहिजे.

viii) अध्यापकांना प्रोत्साहन: योग्य पुरस्कार, पदोन्नती, ओळख आणि नेतृत्व संधींद्वारे अध्यापकांच्या उत्कृष्टतेला प्रोत्साहन दिले पाहिजे.

ix) राज्य शासनाच्या धोरणानुसार आरक्षण: प्रस्तावित समूह विद्यापीठाने राज्य शासनाच्या लागू असलेल्या आरक्षण धोरणाचे काटेकोरपणे पालन करावे.

x) दिव्यांगांसाठी अनुकूल पायाभूत सुविधा: समूह विद्यापीठामधील महाविद्यालयांच्या सर्व इमारती दिव्यांग-अनुकूल असायला हव्यात, दिव्यांग व्यक्तींच्या गरजा पूर्ण करण्यासाठी योग्य भौतिक सुविधा पुरवल्या पाहिजेत.

xi) गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती: समूह विद्यापीठाने गरजू विद्यार्थ्यांना ट्यूशन फी माफी आणि आवश्यकतेनुसार इतर आर्थिक मदत देण्याचे वचन दिले पाहिजे. डीपीआरमध्ये विद्यार्थ्यांची संख्या आणि शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी पात्रता निकष नमूद केले पाहिजेत.

xii) शैक्षणिक, परीक्षा आणि प्रशासन सुधारणा: समूह विद्यापीठाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार शैक्षणिक, परीक्षा आणि प्रशासन सुधारणांसाठी वचनबद्ध असले पाहिजे.

xiii) प्रशासकीय तत्त्वे: प्रस्तावित समूह विद्यापीठाने सहभागी घटक महाविद्यालयांना समान दर्जा, सामूहिक निर्णय घेणे, स्वायत्तता आणि जबाबदारी, स्वातंत्र्य आणि परस्परावलंबन, संस्थांची भागीदारी आणि सामाजिक उत्तरदायित्व या तत्त्वांचे पालन केले पाहिजे.

xiv) विविध अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०१ मधील तरतूदीनुसार शिक्षण शुल्क समितीची स्थापना करणे बंधनकारक राहील व या समितीवर शासन प्रतिनिधी नियुक्त करणे आवश्यक असेल. मा.राज्यपाल नियुक्त प्रतिनिधी व शासन प्रतिनिधी सदर समितीच्या बैठकीस उपस्थित नसल्यास बैठकीची गणपुर्ती पूर्ण होणार नाही.

**उ) समूह विद्यापीठासाठी तपशीलवार प्रकल्प अहवाल/ प्रस्ताव (DPR):**

तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) मध्ये, उपरोक्त निकष, आवश्यक बाबी, वचनबद्धतेसोबतच, पुढील गोष्टींचा समावेश असणे आवश्यक आहे:

i) शैक्षणिक संस्थेचा विकास आराखडा: प्रस्तावित समूह विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढील पाच वर्षांच्या कालावधीचा तपशीलवार आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

ii) इतर सार्वजनिक आणि खाजगी विद्यापीठांप्रमाणे विद्यार्थ्यांना राज्यातील सहभागी महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रम आणि श्रेयांकांसह प्रवेश घेणे आणि ते उपलब्ध होणे सुलभ होण्यासाठी डीपीआरमध्ये प्रस्तावित समूह विद्यापीठाच्या महाविद्यालयांद्वारे विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम आणि श्रेयांक प्रणाली उपलब्ध करण्याच्या विस्तृत धोरणांचा समावेश असावा.

iii) पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. अभ्यासक्रम: डीपीआरमध्ये नाविन्यपूर्ण बहुविद्याशाखीय पदवी, पदव्युत्तर तसेच पीएच.डी.च्या अभ्यासक्रमाची रूपरेषा समाविष्ट करावी. याव्यतिरिक्त, काही कालबद्ध ग्रीनफिल्ड शैक्षणिक कार्यक्रमांचा समावेश असावा.

iv) प्रस्तावित समूह विद्यापीठाने डीपीआरमध्ये बहुविद्याशाखीय दृष्टिकोनासह विद्यमान पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची रुपरेषा/ योजनांचा उल्लेख केला पाहिजे.

v) समूह विद्यापीठाने सुयोग्य व पारदर्शक प्रवेश पद्धती शासनाच्या प्रचलित नियमानुसार डिपीआर मध्ये नमूद करावी.

vi) समूह विद्यापीठाने सर्वंकष खर्चाचा आराखडा निधीच्या वाटपासह व उत्तरदायित्वासह पारदर्शकपणे डिपीआर मध्ये सादर करावा.

vii) शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, प्रस्तावित समूह विद्यापीठाने डीपीआरमधील अधिका-यांची सु-परिभाषित संस्थात्मक रचना आणि पदानुक्रमाची रूपरेषा आखली पाहिजे. संरचनेत नेतृत्व स्तर, संस्था, अधिकारी आणि समूह विद्यापीठामधील विविध कार्यांसाठी जबाबदार अधिकारी यांचा

समावेश असावा. याव्यतिरिक्त, राज्य शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून, अंतर्गत प्रशासन रचनेसाठी आवश्यक असलेल्या इतर कोणत्याही समित्या स्थापन करण्याच्या तरतुदी या प्रस्तावात समाविष्ट केल्या पाहिजेत. यामुळे समूह विद्यापीठाच्या यशस्वी कार्यान्वयनासाठी एक पारदर्शक आणि कार्यक्षम शासकीय संरचनेची हमी मिळते.

viii) प्रस्तावित समूह विद्यापीठाने भविष्यातील विस्तारासाठी अतिरिक्त पायाभूत सुविधा, मनुष्यबळ आणि इतर संसाधनांची आवश्यकता नमूद करावी. डीपीआरमध्ये प्रस्तावित समूह विद्यापीठासाठी आवश्यक असलेल्या आर्थिक संसाधनांच्या एकत्रिकरणासाठीच्या तरतुदींचा स्पष्ट उल्लेख असलेल्या पाच वर्षांच्या आर्थिक अंदाजांचा समावेश असावा.

**२) समूह विद्यापीठाच्या निर्मितीची प्रक्रिया:**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३ (६) मधील तरतूदीनुसार समूह विद्यापीठ स्थापन करण्यात येतील त्यासाठी खालीलप्रमाणे प्रक्रिया राबविण्यात येईल.

i) इच्छुक शैक्षणिक संस्था/ व्यवस्थापनांनी अर्ज करणे: या मार्गदर्शक तत्त्वांनुसार महाविद्यालये/ उच्च शैक्षणिक संस्थांचे इच्छुक व्यवस्थापने त्यांच्या महाविद्यालयांचे समूह विद्यापीठांमध्ये रूपांतर करण्यासाठी शासनाकडे अर्ज करतील.

ii) तपशीलवार प्रकल्प अहवाल (डिपीआर): स्वारस्य असलेले शैक्षणिक संस्था/ व्यवस्थापन या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आवश्यक असलेल्या सर्व तपशीलांचा समावेश असलेला तपशीलवार प्रकल्प अहवाल सादर करतील.

iii) प्रस्तावाची छाननी: प्राप्त झालेल्या डीपीआरची छाननी करण्यासाठी राज्यशासनाद्वारे एक समिती नियुक्त केली जाईल. छाननीमध्ये आवश्यकतेनुसार सहभागी महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटींचा समावेश असू शकतो.

iv) शिफारस आणि मान्यता: समिती आवश्यक तपशील आणि स्पष्टीकरण मिळविण्यासाठी प्रश्न उपस्थित करू शकेल, त्याचे स्पष्टीकरण मिळवेल आणि त्यानंतर, प्रकरणनिहाय प्रस्तावांबद्दल आपल्या शिफारसी सादर करेल. राज्य मंत्रिमंडळ व विधानमंडळाच्या मान्यतेनंतर विद्यापीठ स्थापनेबाबतची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल.

३) समूह विद्यापीठे तयार करताना त्याकालावधीत संबंधित प्रमुख महाविद्यालय आणि घटक महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी त्यांचे पदवी/ पदव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत त्या महाविद्यालयांच्या मूळ विद्यापीठांशीच संलग्नित राहतील.

४) समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट होणा-या अनुदानित महाविद्यालयासाठीचे अनुदान विद्यापीठ स्थापन होण्याच्या दिनांकापर्यंत त्यांना मंजूर असलेल्या अनुदानित शिक्षक शिक्षकेतर पदांसह पुढे सुरु राहील.

**५) समूह विद्यापीठाचे विघटन:**

i) पालक मंडळ, विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना आणि विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आणि शासनाला किमान एक वर्ष अगोदर पुरेशा कारणांसह नोटीस देऊन विद्यापीठ विसर्जित करू शकते.

ii) विद्यमान विद्यापीठाने कायद्यातील कोणत्याही तरतुदींचे किंवा तेथे केलेल्या नियमांचे, कायद्याचे किंवा अध्यादेशांचे उल्लंघन केले आहे, किंवा अधिनियम किंवा अधिसूचनेद्वारे जारी केलेल्या कोणत्याही निर्देशांचे उल्लंघन केले आहे, असे राज्यशासनाला दिसून आल्यास, किंवा प्रस्तावित विद्यापीठात कोणतेही उपक्रम राबविणे बंद केलेअसल्यास, प्रस्तावित विद्यापीठात आर्थिक गैरव्यवस्थापन किंवा गैर- प्रशासनाची परिस्थिती उद्भवली असेल, तर ते प्रस्तावित विद्यापीठाला पंचेचाळीस दिवसांच्या आत कारणे दाखविण्याची आवश्यकता असलेली नोटीस जारी करू शकते.

iii) विसर्जनाच्या बाबतीत, राज्यशासन, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसह इतर कोणाच्याही आर्थिक, गैर-आर्थिक आणि शैक्षणिक स्वरूपाच्या थकित दायित्वांचे तसेच प्राधिकरणाने अनुपालन न केल्यास शैक्षणिक संस्था नुकसान भरपाई देण्यास वचनबद्ध असल्यास शैक्षणिक संस्थेकडून अशी नुकसान भरपाई वसूल करण्याच्या अनुषंगाने मुल्यांकन आणि पडताळणी करेल. अशा मूल्यांकन आणि निश्चितीच्या प्रक्रियेत शैक्षणिक संस्थेला प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार असेल.

iv) नियमित अभ्यासक्रमांच्या शेवटच्या तुकडीच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर आणि त्यांना पदविका, पदविका किंवा पुरस्कार प्रदान केल्यानंतरच विद्यापीठाचे विसर्जन लागू होईल.

v) विसर्जनानंतर, समूह विद्यापीठाचे प्रमूख महाविद्यालय आणि सहभागी घटक महाविद्यालये राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने मूळ विद्यापीठाशी संलग्न होऊ शकतात.

**६) वित्तीय सहाय्यः**

समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट होणा-या अनुदानित महाविद्यालयांसाठी मंजूर अनुदानित पदांचे वेतन व वेतनेतर खर्चाचे दायित्व सद्यस्थितीत राज्यशासनावर आहे. सदर महाविद्यालयांचे अनुदान विद्यापीठ स्थापन होण्याच्या दिनांकापर्यंत त्यांना मंजूर असलेल्या शिक्षक शिक्षकेतर पदांसह पुढे सुरु राहील.

विद्यापीठाचे कामकाज सुयोग्यरितीने चालण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे सांविधिक पदे निर्माण करण्यात येतील.

| अ.क्र. | पदनाम |
|---|---|
| १ | कुलगुरु |
| २ | कुलसचिव |
| ३ | संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ |
| ४ | संचालक, माहिती स्रोत केंद्र |
| ५ | संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ |
| ६ | संचालक, विद्यार्थी विकास |
| ७ | वित्त व लेखा अधिकारी |

उपरोक्त सांविधिक पदांच्या वेतनासाठी तसेच विद्यापीठाचा प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी राज्य शासनाकडून दरवर्षी रु.१.०० कोटी (रुपये एक कोटी) इतकी ठोक तरतूद पहिल्या ५ वर्षासाठी विद्यापीठाला देण्यात येईल. **याव्यतिरिक्त होणारा अतिरीक्त व इतर सर्व प्रकारचा खर्च विद्यापीठाने** त्यांच्या **विद्यापीठ निधीतून** भागविणे **अपेक्षित आहे.** तसेच ५ वर्षामध्ये विद्यापीठाने आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होऊन त्यांनतर यावरील संपूर्ण खर्च विद्यापीठ निधीतून भागविणे अपेक्षित आहे.

सदर शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३११२९१७३९०६९९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=deb455609479b6c7f30e7f1f9a8360c0f8600a542859e8f. e229d6ea333415e8d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=99EB928028DF71EBDFCD289EE209D499192AD3 899261FEAD42F7D38A3141A869, cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2023.11.29 17:43:19 +05'30'

(अ.म.बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.
७. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे.
८. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. सहसंचालक, उच्च शिक्षण/ तंत्रशिक्षण, सर्व विभागीय कार्यालये.
१२. सर्व उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवड नस्ती (विशि-३) , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी/ व्यवस्थापनाने शासनाकडे अर्ज करण्याच्या कार्यपद्धतीबाबत व तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) बाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण - २०२३/ प्र.क्र.११२/ विशि - ३,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १० जानेवारी, २०२४

**संदर्भ-** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण - २०२३/ प्र.क्र.११२/ विशि - ३ दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३

**प्रस्तावना :**

राज्यात एकाच शैक्षणिक व्यवस्थापनाच्या अखत्यारीतील किमान दोन ते कमाल पाच अनुदानित आणि विना अनुदानित महाविद्यालयांचे मिळून समूह विद्यापीठ स्थापन करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे संदर्भाधीन दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहेत. त्यानुसार, समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी इच्छुक असलेल्या उच्च शिक्षण संस्थांनी/ व्यवस्थापनांनी शासनाकडे अर्ज करण्याबाबतची कार्यपद्धती व अर्जासह सादर करावयाचा तपशीलवार प्रकल्प अहवाल निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :**

समूह विद्यापीठ स्थापन करण्यास इच्छुक शैक्षणिक संस्था/ व्यवस्थापनाने शासनाकडे अर्ज सादर करताना अशा अर्जाचे/ प्रस्तावांचे संस्करण करण्यासाठी रु.२५;०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) असे संस्करण शुल्क प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई यांच्या नावे धनाकर्षाद्वारे जमा करणे आवश्यक राहील.

इच्छुक शैक्षणिक संस्था/ व्यवस्थापनांनी अशा धनाकर्षासह या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट- अ मध्ये विहित केल्याप्रमाणे अर्ज आणि परिशिष्ट- ब मध्ये विहित केल्याप्रमाणे प्रस्तावित समूह विद्यापीठासंदर्भातील तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) सर्व आवश्यक कागदपत्रांसह प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दालन क्र. ४०९, मंत्रालय (विस्तार), मुंबई येथे सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०११०१८४८४३७७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT DATTATRAYA KATKAR

Digitally signed by AJIT DATTATRAYA KATKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT,
2.5.4.20=6ab66d3253a5332c701bb9922697b252dc2300d3e9cfa0b93c88a8c299b2 19a0, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=1DAE81E2CCBD6C60BC3D6910B0OEA5E542807 1091ADE593F6D918 786037C86A1, cn=AJIT DATTATRAYA KATKAR
Date: 2024.01.10 18:49:57 +05'30'

(अ द . काटकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

६. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.

७. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे.

८. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.

९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१०. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

११. सहसंचालक, उच्च शिक्षण/ तंत्रशिक्षण, सर्व विभागीय कार्यालये.

१२. सर्व उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३. निवड नस्ती (विशि-३) , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

**शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण - २०२३/ प्र.क्र.११२/ विशि - ३, दिनांक १०जानेवारी, २०२४**
**सोबतचे**
परिशिष्ट- अ

**प्रस्तावित समूह विद्यापीठ स्थापन करण्याकरीता संस्थेने/ व्यवस्थापनाने कारावयाचा अर्ज**

१. संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता-
२. संपर्क व्यक्तीचा तपशील- नाव, पदनाम, दुरध्वनी/ भ्रमणध्वनी क्र. आणि ई- मेल
३.संस्था नोंदणीचा तपशील -

शैक्षणिक संस्था-

(एक) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेली विश्वस्त व्यवस्था किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०,अन्वये नोंदणी केलेली संस्था.
(दोन) भारतीय न्यास अधिनियम, १८८२ अन्वये नोंदणीकृत असलेली कोणतीही सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था.
(तीन) कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम २५नोंदणीकृत असलेली कोणतीही शैक्षणिक संस्था असणे आवश्यक राहील.

४. शैक्षणिक संस्थेची घटना-

यासंदर्भात सादर करावयाचे दस्तऐवज

१. नोंदणी प्रमाणपत्र
२. संविधान, उपविधी, नियम आणि नियम
३. संस्थेच्या सदस्यांनी समूह विद्यापीठ स्थापन करण्यासाठी केलेल्या ठरावाची प्रत,

५. प्रस्तावित समूह विद्यापीठ स्थापन करावयाचे ठिकाण- जिल्हा

६. प्रस्तावित समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट होणा-या प्रमूख व घटक महाविद्यालयांचा तपशील

| अनु. क्र | सहभागी महाविद्यालयाचे नाव व पत्ता | संलग्न विद्यापीठ | स्थापनेची तारीख | अनुदानित/ कायम विनाअनुदानित | AISHE कोड | विद्यार्थी प्रवेश क्षमता | नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | NAAC/ NBA प्रमाणनची स्थिती (NBA मानांकनाची टक्केवारी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

यासंदर्भात सादर करावयाचे दस्तऐवज

I. महाविद्यालय/ संस्थानिहाय विद्यापीठ प्रमाणित कार्यक्रम/अभ्यासक्रमांचा तपशील.
II. महाविद्यालय/ संस्थानिहाय कार्यक्रम/अभ्यासक्रमांसाठी गेल्या तीन वर्षामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा तपशील (विद्यापीठ प्रमाणित)
III. नॅक/ एनबीए प्रमाणपत्र
IV. अनुदानित महाविद्यालयाच्या अनुषंगाने आवश्यक ती प्रमाणित कागदपत्रे. (अनुदान मंजूरीच्या मूळ आदेशाची प्रत)

**७. प्रस्तावित समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट होणा-या माहाविद्यालयांच्या/ संस्थांकडील जागा व बांधकामाबाबतचा तपशील**

| अ. क्र. | सहभागी महाविद्यालयाचे नाव | जमीन धारणा (हेक्टर) | | एकूण बांधकाम क्षेत्रफळ चौ.मी | | अनुपालन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आवश्यक | वास्तविक | आवश्यक | वास्तविक | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | एकूण | | | | | होय/ नाही |

यासंदर्भात सादर करावयाचे दस्तऐवज

I. जमिनीच्या मालकीचे दस्तऐवज (विक्री करार, ७/१२ उतारे), जर जमीन भाडेतत्वावर असेल तर भाडेपट्टा करार (प्रस्तावित विद्यापीठाची जागा (ग्रामीण / तहसील किंवा जिल्हा मुख्यालय / विभागीय मुख्यालय / MMR) या श्रेणीत येते याबाबत तहसीलदार/ MMRDA इत्यादींद्वारे प्रमाणित केलेले कागदपत्र.

II. सहभागी महाविद्यालये/ संस्थांचा बांधकाम आणि इमारत आराखडा मंजूरीचे कागदपत्रे —(महानगरपालिका / जिल्हाधिकारी कार्यालय (ग्रामीण) / नगर पंचायत (ग्रामीण) / स्थानिक प्राधिकरणाकडून प्रमाणित.

III. सहभागी महाविद्यालये/ संस्थांच्या विद्यमान कॅम्पसचे जिओ टॅग केलेले छायाचित्रे:

IV. प्रशासकीय ब्लॉक, शैक्षणिक खंड, प्रयोगशाळा, ग्रंथालये, वसतिगृहे, अतिथी गृह , कर्मचारी निवासस्थान, क्रीडा सुविधा, कॉन्फरन्स हॉल, मोकळ्या जागा आणि तत्सम इतर सुविधा. वर नमूद सुविधांचे वेगवेगळ्या कोनातून प्रत्येकी तीन जिओटॅग केलेले फोटो जोडावेत.

V. सहभागी महाविद्यालयांची / संस्थांची जमीन कोणत्याही विवादाखाली किंवा लवादाच्या ताब्यात नसल्याबाबतचे संस्थेकडून/ व्यवस्थापनाचे प्रतिज्ञापत्र.

**८. प्रस्तावित समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट महाविद्यालये/ संस्थेतील मनुष्यबळ**

| अ. क्र. | सहभागी महाविद्यालयाचे/ संस्थेचे नाव | अनुदानित/ कायम विना अनुदानित | मंजूर अनुदानित शिक्षकीय पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | मंजूर अनुदानित शिक्षकेतर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

श्रेणीनुसार ब्रेकअप

| अ. क्र. | सहभागी महाविद्यालयाचे/ संस्थेचे नाव | प्राध्यापकांची संख्या | पूर्णवेळ सहयोगी प्राध्यापकांची संख्या | पूर्णवेळ सहाय्यक प्राध्यापकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

**९. समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट महाविद्यालये/ संस्थांमध्ये राबविण्यात येणारे अभ्यासक्रमांचा तपशील**

| अ. क्र. | सहभागी संस्थांची नावे | उपलब्ध करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांची संख्या | उपलब्ध करण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमांची संख्या | डिप्लोमा प्रमाणपत्र अभ्यासक्रम/मूल्यवर्धित अभ्यासक्रमांची संख्या |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

यासंदर्भात सादर करावयाचा तपशील-
(कृपया विद्याशाखा/विभाग, वैधानिक संस्थांची मान्यता; यूजी/पीजी अभ्यासक्रमांची संख्या, अभ्यासक्रमानुसार मान्यताप्राप्त विद्यार्थ्यांचे प्रवेश, गेल्या ३ वर्षांत प्रवेश घेतलेले विद्यार्थी इत्यादींबाबत संस्थावार तपशील.)

**१०. मागील तीन वर्षांतील संस्थानिहाय आणि अभ्यासक्रमनिहाय निकालांचा तपशील.**

| अ. क्र. | महाविद्यालय/ संस्थांची नावे | परीक्षेला बसलेले विद्यार्थी | इच्छित क्रेडिट्स मिळवले विद्यार्थ्यांचे प्रमाण % | O ग्रेड असलेले विद्यार्थी % | A ग्रेड असलेले विद्यार्थी % |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

**११. प्रस्तावित समूह विद्यापीठात समाविष्ट महाविद्यालय/ संस्थेनुसार इंटर्नशिप आणि प्लेसमेंट बाबतचा तपशील ( गेल्या शैक्षणिक वर्षातील)**

| अ. क्र. | महाविद्यालय/ संस्थांची नावे | उपलब्ध करण्यात आलेल्या इंटर्नशिपची संख्या | कॅम्पस मुलाखतीसाठी भेट दिलेल्या कंपन्यांची संख्या | उपलब्ध करण्यात आलेल्या प्लेसमेंटची संख्या |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

यासंदर्भात तपशीलवार माहिती सादर करावी.

**१२. प्रस्तावित समूह विद्यापीठात समाविष्ट महाविद्यालय/ संस्थेनुसार संशोधन आणि विकास** संशोधन केंद्रांची संस्थानिहाय कामगिरी (गेली तीन वर्षातील)

| अ. क्र | महाविद्यालय/ संस्थांची नावे | संशोधन केंद्रांची संख्या | संशोधन मार्गदर्शकांची संख्या | पीएच.डी.चा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या | पीएच.डी.ची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

यासंदर्भात तपशीलवार माहिती द्यावी:

**१३. संशोधन कार्याचे फलनिष्पत्ती (मागील तीन वर्षातील)**

| अ. क्र. | महाविद्यालय/ संस्थांची नावे | पीअर रिव्ह्यू केलेल्या जर्नल्समध्ये प्रकाशित झालेल्या प्रबंधांची संख्या | मंजूर पेटंट ची संख्या | पेटंटसाठी अर्जांची संख्या | संशोधन प्रकल्पांसाठी शासनाकडून मिळालेले अनुदान | संशोधन प्रकल्पांसाठी सरकारी संस्थांव्यतिरिक्त इतरांकडून मिळालेले अनुदान |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

यासंदर्भात खालील मुद्द्याच्या अनुषंगाने तपशीलवार माहिती द्यावी.

संस्थानिहाय पेटंट, कॉपी राइट्स, टेक्नॉलॉजी ट्रान्सफर, एच इंडेक्ससह पाच सर्वोत्कृष्ट शोधनिबंधांचे तपशील,

संस्थानिहाय विद्याशाखा/विभागाचे नाव, पूर्ण झालेल्या/प्रगतीवरील संशोधन प्रकल्पांची संख्या, प्रायोजक एजन्सी, मिळालेला निधी.

**१४.सहयोगिता-**

सामंजस्य कराराच्या सहकार्याच्या तारखेचा संस्थानिहाय तपशील, सहयोगाचे प्रमुख परिणाम.

**१५. प्रस्तावित समूह विद्यापीठात समाविष्ट महाविद्यालय/ संस्थेतील विद्यार्थ्यांच्या उपलब्धी (शैक्षणिक व्यतिरिक्त)**

| संस्थेचे नाव | राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील पारितोषिकांची संख्या | | स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी | समुदाय सेवेतील विद्यार्थ्यांची संख्या | विज्ञान मेळावे आणि हॅकार्थॉनमधील पारितोषिकांची संख्या | स्टार्ट अप्सची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | खेळ | सांस्कृतिक | | | | |
| | | | | | | |

तपशीलवार माहिती सादर करावी.

**१६. ग्रंथालय आणि ICT पायाभूत सुविधा:**

**प्रस्तावित समूह विद्यापीठात समाविष्ट महाविद्यालय/ संस्थेतील खालीलप्रमाणे माहिती**

| संस्थेचे नाव | पुस्तकांची संख्या | जर्नल्सची संख्या | ई-पुस्तकांची संख्या | डेटाबेसची संख्या | LMS | सरासरी वार्षिक बजेट | वाचन कक्ष क्षमता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

तपशीलवार माहिती सादर करावी.

**आयसीटी पायाभूत सुविधा:**

| सहभागी संस्थेचे नाव | डिव्हाइस उपलब्धता: | | | वाय-फाय बँडविड्थ आणि गती | सॉफ्टवेअर परवान्यांची संख्या | डिजिटल सामग्री डेटाबेस | सुरक्षा प्रोटोकॉल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | लॅपटॉप | संगणक | स्मार्ट बोर्ड | | | | |
| | | | | | | | |

तपशीलवार माहिती सादर करावी.

१७. प्रस्तावित समूह विद्यापीठात समाविष्ट प्रमूख महाविद्यालयासंदर्भातील प्रशासनाची रचना, स्वायत्ततेचे कार्य, भविष्यकालीन कार्यक्रम /अभ्यासक्रम, संशोधन उत्पादन, पायाभूत सुविधा, कौशल्य, आघाडीच्या महाविद्यालयाची उपलब्धी यांचा तपशील द्यावा.

**१८. शैक्षणिक संस्थेद्वारे चालविण्यात येत असलेले अन्य महाविद्यालये/ संस्था**

| अ. क्र. | महाविद्यालय/ संस्थेचे नाव | स्थापनेचे वर्ष | संलग्न विद्यापीठ | प्रमाणित अभ्यासक्रम | विद्यार्थी प्रवेश क्षमता | नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | नॅक/ एनबीए स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

यासंदर्भात विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र सादर करावे.

**१९. संस्करण शुल्काबाबतचा तपशील. (रु.२५,०००/-धनाकर्ष )**

**२०. किमान ठेवी बाबतचा तपशील**

**अर्ज सादर करावयाच्या वर्षातील त्यापुढील ५ वर्ष कालावधीची रु.५ कोटी रक्कमेची राष्ट्रीयकृत बँकेमधील उच्च शिक्षण संचालनालयासोबतची संयुक्त मुदत ठेव.**

**२१. संस्थेचे मागील ३ वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल.**

**२२. संस्थेच्या चल व अचल मालमत्तेचे विवरण.**

**शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण - २०२३/ प्र.क्र.११२/ विशि - ३, दिनांक १०जानेवारी, २०२४**

**सोबतचे**

**परिशिष्ट- ब**

१. प्रस्तावित समूह विद्यापीठाचे पूर्ण नाव-

२. प्रस्तावित समूह विद्यापीठाचे स्थान-जिल्हा, तालुका, गाव, पिन कोड

३.प्रस्तावित समूह विद्यापीठामधील घटक महाविद्यालयांचे प्रमूख महाविद्यालयापासूनचे अंतर

| अ. क्र. | सहभागी प्रमूख व घटक महाविद्यालयाचे/ संस्थेचे नाव | सहभागी महाविद्यालया संस्थेचा पत्ता | प्रमूख महाविद्यालयापासून अंतर. कि.मी. |
|---|---|---|---|
| | | | |

प्रमाणीकृत स्थान नकाशा (उदा. शहर सर्वेक्षण, जिल्हा सर्वेक्षण )

४. प्रस्तावित समूह विद्यापीठाचे ध्येय आणि उद्दिष्टांची सविस्तर माहिती.

५. प्रस्तावित समूह विद्यापीठाची प्रशासकीय संरचना तसेच यासंरचणेमध्ये सद्यस्थितीतील महाविद्यालयांमधील प्रशासकीय पदांचे (उदा. प्राचार्य, रजिस्ट्रार, लेखापाल, ग्रंथपाल) असलेले स्थान याबाबतची माहिती.

६. समूह विद्यापीठाचे शाळा प्रणालीमध्ये रुपांतरण करताना सहभागी महाविद्यालयांमधील विलीनीकरण, समूहीकरण आणि सहकार्य बाबतचे संस्थात्मक धोरण विस्तृत करावे.

७. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये नमूद केलेल्या सर्व कृती मुद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी टप्प्याटप्प्याने प्रस्तावित योजना विस्तृत करावी.

८. प्रस्तावित समूह विद्यापीठाच्या NEP शी संरेखित आणि राज्य सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याच्या नवीन श्रेयांक आराखड्याची रूपरेषा द्यावी.

९. प्रस्तावित समूह विद्यापीठाने हाती घ्यावयाच्या अभ्यास आणि संशोधनाच्या प्रस्तावित नैसर्गिक आणि बहुविद्याशाखीय ग्रीनफिल्ड अभ्यासक्रमांची व संशोधनाची यादी आणि या अभ्यासक्रमांची/ संशोधनाची प्रासंगिकता आणि विकासात्मक उद्दिष्टे आणि राज्याच्या रोजगाराच्या गरजा विस्तृत कराव्यात. (प्रस्तावित केलेले अभ्यासक्रम UGC च्या नामाभिधानाप्रमाणे आणि NEP २०२० मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाकडून वेळोवेळी निर्गमित निर्देशांप्रमाणे असावेत.)

| **अभ्यासक्रमाचे नाव** | **अभ्यासक्रमाचा कालावधी** | **प्रस्तावित प्रवेश क्षमता** | **अभ्यासक्रमाचे शुल्क** | **औचित्य** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

यासंदर्भात अभ्यासक्रमाच्या गरजेचे विश्लेषण, व्यवहार्यता, अभ्यासक्रमाची सामग्री, अभ्यासक्रमाचे बहुविद्याशाखीय शिक्षण, क्रेडिट सिस्टीम, मूल्यमापन फ्रेम वर्क, आवश्यक मनुष्यबळ, अतिरिक्त पायाभूत सुविधांची आवश्यकता याबद्दल माहिती द्यावी.

१०. प्रस्तावित समूह विद्यापीठांतर्गत स्थानिक गरजांशी संबंधित अभ्यासक्रम तसेच संदर्भित संशोधनाचे काम सुरू करण्याबाबतची माहिती द्यावी. यामध्ये

- विश्लेषणाची गरज, व्यवहार्यता अभ्यास, कार्यक्रमाचे उद्दिष्ट, समाजावर होणारा संभाव्य परिणाम, जागरूकता योजना
- संशोधन क्षेत्रे आणि संशोधन थीम, त्याचा समाजावर होणारा परिणाम, वापरावयाची सुविधा आणि साधने

११. अभ्यासक्रमांच्या नावनोंदणी लक्ष्यांसह टप्प्याटप्प्याने पाच वर्षांचा आराखडा सादर करावा. अंमलबजावणीबाबतची प्रस्तावित कार्यपद्धती विषद करावी.

१२. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठीच्या प्रणालीबाबतची माहिती.

| प्रस्तावित अभ्यासक्रमाचे नाव | प्रस्तावित अभ्यासक्रमाचा कालावधी | प्रस्तावित अभ्यासक्रमाची पात्रता | क्रेडिट इतर आवश्यकता | निवड प्रक्रिया | शिष्यवृत्ती (असल्यास) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

- अर्ज प्रक्रिया (ऑनलाइन/ऑफलाइन), विद्यार्थी निवडण्याचे निकष, अभ्यासक्रमनिहाय निवड प्रक्रिया, प्रवेश परीक्षा, मूल्यमापन प्रक्रिया,
- विविध श्रेणींसाठी आरक्षण, शिष्यवृत्ती योजना

१३. प्रादेशिक भाषांमधील प्रस्तावित अभ्यासक्रमांची माहिती द्यावी.

| अभ्यासक्रमाचे नाव | प्रस्तावित प्रादेशिक भाषा | अर्थातच साहित्य Y/N उपलब्धता | अभ्यासक्रम सामग्रीच्या निर्मितीची टाइमलाइन |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

१४. अध्यापनाचे परिपुर्ण कार्यप्रदर्शनाच्या मूल्यमापनाचे प्रस्तावित धोरण, उत्कृष्ठ अध्यापकांना प्रोत्साहन व पुरस्कार याबबातचे सविस्तर धोरण स्पष्ट करावे.

१५. टप्प्यानुसार शैक्षणिक, प्रशासकीय आणि परीक्षा सुधारणा धोरण तपशीलवार द्या.

**व्यवसायिक योजना/ संसाधनांचे एकत्रीकरण**

यामध्ये योग्य स्पष्टीकरणासह खालील कागदपत्रांचा समावेश असावा.

अंदाजित रोख प्रवाह विवरण (पुढील ५ वर्षे )

अनुमानित उत्पन्न आणि खर्च विवरण (पुढील ५ वर्षे )

| **निधीची आवश्यकता** | **१ वर्ष -** | **२ रे वर्ष** | **३ रे वर्ष** | **४ थे वर्ष** | **५ वे वर्ष** |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | | | | | |
| आवर्ती | | | | | |
| इतर कोणतेही | | | | | |
| एकूण | | | | | |

| **स्रोत** | **१ वर्ष -** | **२ रे वर्ष** | **३ रे वर्ष** | **४ थे वर्ष** | **५ वे वर्ष** |
|---|---|---|---|---|---|
| प्रायोजक संस्था | | | | | |
| फी | | | | | |
| कर्ज | | | | | |
| समुपदेशन | | | | | |
| इतर कोणतेही | | | | | |
| एकूण | | | | | |

तपशीलवार नोंद यथोचित स्पष्टीकरणासह सादर करावी.

संसाधनांची जमवाजमव करण्याची योजना आणि त्यावरील भांडवलाची किंमत आणि अशा स्त्रोतांची परतफेड करण्याची पद्धत
यामध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावीत.

- प्रक्षेपित रोख प्रवाह विवरण (पुढील ५ वर्षे )
- अनुमानित उत्पन्न खर्च विवरण (पुढील ५ वर्षे )
- कर्ज परतफेडीचे विवरण (असल्यास) (पुढील ५ वर्षे )

**भविष्यातील पायाभूत सुविधा विस्तारासाठीच्या टप्पानिहाय योजना**

| विभाग / सुविधा | वर्षानुसार प्रस्तावित बांधकामे चौ.मी. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १ वर्ष | २ रे वर्ष | ३ रे वर्ष | ४ थे वर्ष | ५ वे वर्ष |
| | | | | | |

**खरेदी योजना:**

| आयसीटी पायाभूत सुविधा | १ वर्ष | २ रे वर्ष | ३ रे वर्ष | ४ थे वर्ष | ५ वे वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| लॅब.उपकरणे | | | | | |
| इतर १ | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |

**याशिवाय, खालीलबाबतीत संस्थेचे प्रतिज्ञापत्रे सादर करावीत.**

१. उच्च शिक्षणातील आरक्षणाबाबतच्या राज्य शासनाच्या धोरणाचे काटेकोरपणे पालन करण्यास संस्था बांधिल असल्याबाबत.

२. नियामक संस्था (UGC, AICTE, NCTE, BCI, PCI, ACI, तत्सम इतर संस्था) आणि राज्य शासनाने निश्चित केलेल्या नियम, विनियमांचे पालन संस्थेकडून केले जाईल.

३. समूह विद्यापीठाचा दर्जा मिळवण्यासाठी अर्ज सादर करण्याच्या तारखेपूर्वीच्या पाच वर्षांच्या कालावधीत संस्थेने (संस्थांनी) कोणत्याही वैधानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही नियमांचे/ मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केलेले नाही याबाबत प्रतिज्ञापत्र.

४. विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वसतिगृहाची योग्य व्यवस्था केली जाईल व त्यामध्ये सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

५. समूह विद्यापीठ स्थापन करण्यासाठी ठेवम्यात आलेली किमान ठेव शासनाच्या पुर्वपरवानगीशिवाय काढून घेता येणार नाही. त्यावर कोणतेही कर्जबोजा तयार करता येणार नाही व या किमान ठेवीवरील व्याज समूह विद्यापीठाच्या विकासासाठी वापरण्यात येईल.

६. समूह विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर यामधील समाविष्ट प्रमूख महाविद्यालय व घटक महाविद्यालयातील कर्मचा-यांच्या वेतन व वेतनेतर खर्च (मंजूर अनुदानित पदांचा वेतन खर्च वगळून) आणि महाविद्यालयांच्या विकासात्मक/ देखभाल दुरुस्तीवरील खर्च संस्थेद्वारे करण्यात येईल.
७. समूह विद्यापीठात समाविष्ट महाविद्यालय/ संस्थेचे उत्पन्न आणि मालमत्ता, महाविद्यालयाच्या/ संस्थेच्या वाढ आणि विकासासह तिच्या उद्दिष्टांच्या संवर्धनासाठीच वापरला जाईल. अशा उत्पन्नाचा कोणताही भाग प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, संस्थेचे सदस्य असलेल्या/ आहेत अशा व्यक्तींना अदा

किंवा हस्तांतरित केले जाणार नाही, तथापि, येथे समाविष्ट असलेली कोणतीही गोष्ट सद्भावनेने किंवा मोबदला देण्यास प्रतिबंध असणार नाही. संस्थेच्या कोणत्याही सदस्याला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला त्यांनी संस्थेला दिलेल्या कोणत्याही सेवेच्या मोबदला किंवा प्रवास आणि इतर तत्सम शुल्क, आणि असे सर्व खर्च संस्थेच्या लेख्यांमध्ये उचित रीतीने परावर्तित केले जातील.

८. प्रस्तावित समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट महाविद्यालये/ संस्थांच्या इमारती, पायाभूत सुविधा दिव्यांगासाठी अनुकूल असतील याबाबत प्रतिज्ञापत्र द्यावे.

९. प्रस्तावित समूह विद्यापीठ इनोव्हेशन इकोसिस्टम आणि स्टार्ट-अप संस्कृतीला चालना देण्यासाठी इनोव्हेशन आणि इनक्युबेशन सेंटरची स्थापना करेल याबाबत प्रतिज्ञापत्र द्यावे.

१०. प्रस्तावित समूह विद्यापीठाच्या प्रशासकीय संरचना, नियामक मंडळ यामध्ये विद्यापीठात समाविष्ट सर्व प्रमूख व घटक महाविद्यालयांना समप्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात येईल जेणे करुन शैक्षणिक कार्यक्रम, आर्थिक योजनांची प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने लोकशाहीपद्धतीने निर्णय घेणे शक्य होईल.

वर नमूद केलेल्या माहिती व्यतिरिक्त, प्रायोजक संस्था त्यांना समूह विद्यापीठ स्थापनेसाठी आवश्यक वाटणा-या यासंबंधित उचित बाबींची माहिती देऊ शकेल.

टीप- वरील सर्व बाबींबाबत संस्थेच्या प्रमुखाने रीतसर साक्षांकित केलेल्या माहितीच्या समर्थनार्थ कागदोपत्रे सादर करण्यात यावेत.

********